कार्यारंभ आदेश

करंजी ता.कोपरगाव ते राज्य मार्ग ६५ जोडरस्ता ग्रामीण मार्ग १८ रस्ता डांबरी पृष्ठभागाचे खड्डे भरणे साखळी क्रमांक २/४०० ते ३/०० ग्रामीण मार्ग १८ ता.कोपरगाव कामाचा कार्यारंभ आदेश.

जिल्हा परिषद,अहमदनगर
सार्वजनिक बांधकाम उत्तर विभाग,
जिल्हा परिषद आदेश क्रं.साबाउ/लेखा३/345/२०१८
दिनांक १४.१२.२०१८

संदर्भ :- १) प्रशाकीय मान्यता आदेश क्रं. कार्या४/प्रशा२/उत्तर/५८/२०१८ दि.२८.४.२०१८
२) धनाकर्ष क्रमांक ६८२६१ दि.१३.१२.२०१८

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ च्या आदेशान्वये विषयांकीत कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. तसेच कामास तांत्रिक मान्यताही प्राप्त झालेली आहे. आपण उक्त कामाचा करारनामा पूर्ण केलेला आहे. प्रस्तुत कामाचा मक्ता आपणास देणेत येत आहे. आपण सदर काम उपअभियंता जि.प.सा.बां.उपविभाग **कोपरगाव** यांचे देखरेखीखाली व मानांकनाप्रमाणे करावे व पुढील पत्रव्यवहार त्यांचेमार्फतच करावा. तसेच काम सुरु करणेपूर्वी शाखा अभियंता / उपअभियंता यांचेकडून तांत्रिक मार्गदर्शन घेऊनच कामास सुरुवात करावी. पूर्व परवानगी शिवाय कामास सुरवात करु नये.

**या कामावर बाल कामगार (प्रतिबंध व निर्मुलन) अधिनियम १९६८ चे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच कार्यारंभ आदेश दिल्यापासून सबळ कारणाशिवाय एक महिन्याच्या आत काम सुरु केले नाही तर सदर कार्यारंभ आदेश आपोआप व्यपगत होईल. .त्यानंतर भाग घेतलेल्या इतर निविदाधारकापैकी आर्थिक तक्त्याच्या क्रमानुसार जो न्युनतम दरास काम करणेस तयार होईल अशा निविदाधाकाकडून नमूद काम पूर्ण करुन घेणेची विहित पध्दतीने कार्यवाही पूर्ण करणेत येईल.**

कामाचा दोष निवारण कालावधी दोन वर्ष राहील. कामाच्या ठिकाणी कंत्राटदाराचे नांव, कार्यारंभ आदेश दिनांक, कामाची निविदा रक्कम, काम पुर्ण करण्याचा दिनांक, दोष निवारण कालावधी इ. माहिती असलेला फलक दर्शनी भागात लावण्यात यावा.

| अ. नं | कामाचे नांव | निविदा रक्कम | काम पूर्ण करणेचा कालावधी | लेखाशिर्ष | देकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | करंजी ता.कोपरगाव ते राज्य मार्ग ६५ जोडरस्ता ग्रामीण मार्ग १८ रस्ता डांबरी पृष्ठभागाचे खड्डे भरणे साखळी क्रमांक २/४०० ते ३/०० ग्रामीण मार्ग १८ ता.कोपरगाव | २६३४४० | ३ महिने | ३०५४२४१९ रस्ते विशेष दुरुस्ती गट अ २०१७-२०१८ | अंदाजपत्रकीय दराने. |

सदर कामाचा विमा शासकीय विमा निधीकडे उतरवुन विमा उतरविल्याची पावती या कार्यालयास सादर करावी

शासन परिपत्रक क्रं.२०१८/प्र.क्रं.१९८/बांध४/दिनांक १२.१०.२०१८ नुसार कंत्राटदारांनी कामगारांची कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदणी करणे बंधनकारक आहे.सदरची नोंदणी करुन नोंदणी केल्याचे दस्तऐवज या कार्यालयास सादर करणेत यावेत.

सदरची पूर्तता केलेशिवाय कामाचे देयक अदा केले जाणार नाही,याची नोंद घ्यावी.

सदर आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक नं. २०१८१२१४१३०३१३ असा आहे.

कार्यकारी अभियंता
जि.प.सा.बां.उत्तर विभाग अ.नगर

प्रति,

**श्री.संतोष सोपानराव धावडे,**

प्रत - उपअभियंता जि.प.सा.बां.उपविभाग **कोपरगाव ता.कोपरगाव** यांना माहीतीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- कंत्राटदाराने कामाचा आदेश प्राप्त झालेपासुन १५ दिवसांचे आत कामाचा व त्यावरील कामगारांचा शासकीय विमा संचलनालय मुंबई यांचेकडे विमा उतरविणे बंधणकारक असून विमा प्रपत्र प्राप्त झालेची खात्री करावी. व देयका सोबत सादर करावीत.

३/- सदरचे काम संबधित कंत्राटदारास दिलेल्या मुदतीत काम पूर्ण करुन घेणेची जबाबदारी आपली असून सदर काम गुणवत्तापुर्वक व स्पेसिफिकेशन प्रमाणे पूर्ण करुन घेणेत यावे. तसेच कामाचे विनिर्देशाप्रमाणे गुणवत्ता नियंत्रण चाचण्या घेण्यात यावे.

४/- संबंधीत कामाचे शाखा अभियंता यांनी काम सुरु झालेनंतर सदर काम पूर्ण होईपर्यंत वेगवेगळया टप्प्यांची कामांची माहिती व छायाचित्रे निर्माण/नियोजन साईटवर अपलोड करणेत यावे.